# सेवक वार्ता

मार्च-२०२६

वर्ष -७ अंक- ५

**सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र**

**मर्यादापुरुषोत्तम भगवान श्री राम यांच्या जीवनातून आपल्याला विचार, शब्द आणि कार्यामध्ये श्रेष्ठता आणण्यासाठी प्रेरणा मिळो. श्रीराम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा.**



## सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे यांच्या सन २०२३-२४ वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे संक्षिप्त इतिवृत्त

सेवानिवृत्त कर्मचारी संघाची (सेवक संघ) वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ आमझरी ( चिखलदरा ), जिल्हा - अमरावती येथे आयोजित करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान श्री. विश्वास सावरकर, अध्यक्ष, सेवक संघ यांनी भूषविले.

१. कार्यकारी अध्यक्ष यांची प्रस्तावना : सुरुवातीस कार्यकारी अध्यक्ष श्री मदन कुलकर्णी यांनी सेवक संघाने मागील वर्षभरात केलेल्या कामांची थोडक्यात माहिती दिली. ती खालीलप्रमाणे

(1) कै. मा. ग. गोगटे स्मरणार्थ श्री. नितिन काकोडकर , यांनी **Major Issues in Wildlife Management in India** या विषयावर व्याख्यान दिले.

(2) सिरोंचा वन विभागातील कोलामार्का संवर्धन राखीव आणि नागपूर व भंडारा वन विभागातील मोगरकसा - मंगरली संवर्धन राखीव या क्षेत्रांचे व्यवस्थापन आराखडे तयार करून संबंधित यंत्रणेस सादर करण्यात आले.

(3) **Biological Diversity ( Amendment ) Act,2023 and Biological Diversity Rules, 2024**यांचे मराठी भाषेत भाषांतर करण्यात आले.

(4) श्री मो. ह. खेडकर, यांनी चंद्रपूर वनवृत्तातील बांबू फुलोऱ्याबाबत लिहिलेल्या **Treatise on Flowering of Bamboo** या पुस्तकाचे प्रकाशन चंद्रपूर वन प्रबोधिनीमार्फत करण्यात आले.

(5) मध्य प्रदेशातील बेतूल वनवृत्तातील तापी संवर्धन राखीव क्षेत्रासाठी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(6) खालील कामाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आले.

a. सामाजिक वनीकरण विभागाच्या काही योजनांच्या मूल्यांकनाबाबत प्रस्ताव

## *श्रीराम नवमीच्या सर्व वाचकांना शुभेच्छा*

b. महाराष्ट्र जैवविविधता मंडळाकडे **Maharashtra Gene Bank** अंतर्गत दोन विषयांसंदर्भात प्रस्ताव.

(Theme-Communication, Education and Public Awareness

**Theme - Grassland Savannah Biodiversity**

**२. सेवक संघाच्या वृत्तस्तरीय समित्यांनी मागील वर्षभरात केलेल्या कामांचा आढावा -**

अ ) पुणे वृत्त - श्री. पत्की, समन्वयक, सेवक संघ यांनी सेवक संघाच्या पुणे वृत्तस्तरीय समितीने केलेल्या खालील कामे पूर्ण केल्याचे माहिती दिली.

i ) सिरोंचा वन विभागातील कोलामार्का संवर्धन राखीव या क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला.

ii) सोलापूर - धाराशिव रेल्वेमार्गाबाबत वन्यजीव उपशमन आराखडा तयार केला.

ब. नागपूर वृत्त - श्री अशोक खुणे यांनी दिलेली माहिती पुढील
प्रमाणे -

- सेवक संघाची नागपूर वृत्ताची समितीचे गठन मागील वर्षी करण्यात आले.

- - नागपूर वृत्तातील सदस्यांनी मोगरकसा - मंगरली संवर्धन राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार केला.

क . चंद्रपूर वृत्त - श्री खनके यांनी सांगितले की वेगळी अशी कामे मिळाली नाहीत. तथापि पुणे शाखेच्या सदस्यांबरोबर कोलामार्का संवर्धन राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी मदत केली.

ड. - अमरावती वृत्त - अमरावती वृत्ताने केलेल्या कामांबाबत श्री संजय जगताप यांनी सविस्तर माहिती दिली.

- मागील वर्षात तीन प्रकल्प पूर्ण केले.

i. वेस्टर्न कोल फिल्डच्या क्षेत्रासाठी उपशमन योजना

ii. अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या क्षेत्रासाठी उपशमन योजना

iii.भद्रावती येथील ऑर्डनन्स फॅक्टरी क्षेत्रासाठी उपशमन योजना

- अमरावती शाखेतर्फे गुन्हेकामात उत्कृष्ट तपास करण्याचे काम केलेल्या चमूचा सत्कार करण्यात आला. - मोगरकसा - मंगरली संवर्धन राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार केला.

- 'मी वनरक्षक' या पुस्तकाच्या १००० प्रति छापण्यात आल्या . त्यापैकी ८०० प्रति वन विभागास मागणीनुसार पुरविण्यात आल्या.

इ. धुळे वृत्त - धुळे वृत्तातील कामांबाबबत माहिती देताना श्री संभाजी गवळी यांनी सांगितले की -

- सेवक वार्ता नियतकालिक दर महिन्यास प्रसिद्ध केले.

- श्री बी आर छल्लारे आणि श्री जी के निकम यांनी आषाढी वारीमधील पालकी सोहोळ्यात भजन, किर्तनाद्वारे वन्यजीव, पर्यावरण याबाबत जनजागृती केली. या कामाची दखल समाजमाध्यमांनी देखील घेतली.

- 'बारीपाडा येथील रानभाज्या' या पुस्तकांपासून प्रेरणा घेऊन कृषि विभागाने काही नवीन भाज्यांचा समावेश करून याविषीयीचे पुस्तक प्रसिद्ध केले.

३. दिवंगत सदस्यांना आदरांजली

मागील एक वर्षात दिवंगत झालेले सेवक संघाचे सदस्य आणि इतर वन अधिकारी यांना दोन मिनिटे स्तब्धता पळून आदरांजली वाहण्यात आली.

(१) एम. पी. केसरी, (२) हरिश्चंद्र कांबळे, विभागीय वन अधिकारी

(३) विजय सुर्यवंशी, (४) एम. एस. नाईक (५) डी. बी. माळी, (६) मारुती चितमपल्ली, (७) ए. जी. ओक, (८) व्ही. डी. चाफेकर (९) एम. के. शर्मा (१०)अश्विन ठक्कर (११) व्ही. एस. जोशी, (१२) एस. डी. सामंत,(१३) बी. आर. पाचपोर

४. नवीन कार्यकारिणीची निवड –

ठराव क्रमांक १ - १ एप्रिल २०२६ पासून पुढील ३ वर्षांसाठी अस्तित्वात येणाऱ्या नवीन कार्यकारिणीची निवडण्यात आली आणि त्याबाबतचे ठराव सर्व संमतीने मंजूर करण्यात आले.

अध्यक्ष - श्री विश्वास सावरकर

कार्यकारी अध्यक्ष - शेषराव हिम्मतराव पाटील

उपाध्यक्ष -१ - श्री संभाजी खंडू गवळी

उपाध्यक्ष -२ - श्री संजय मधुकरराव जगताप

सहसचिव/ उपसचिव - श्री प्रदीप खंडेराव कुलकर्णी

कोषाध्यक्ष - श्री सत्यजित मदनमोहन गुजर

सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. ज्या शाखांच्या पदाधिकाऱ्यांची मुदत संपत आली आहे त्यांनी १ एप्रिल २०२६ पूर्वी नवीन पदाधिकारी निवडून समिती गठीत करावी अशा सूचना देण्यात आल्या.

नवीन केंद्रीय कार्यकारिणीची निवड झाल्याच्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारांसाठी खालील ठराव करण्यात आला. .ठराव क्रमांक २ -

पुणे येथे सेवानिवृत्त वनकर्मचारी संघाचे जनता सहकारी बँकेच्या सहकारनगर शाखेत बचत खाते क्रमांक ०३६२२०१००००८७७२ खाते असून ते खाते दिनांक ०१/ ०४/ २०२६ पासून खालील एकूण ३ पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही २ जणांच्या स्वाक्षरीने चालविणे, व्यवहार करणे ( ऑपरेट करणे ) बाबतचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

१) श्री शेषराव हिम्मतराव पाटील, कार्यकारी अध्यक्ष

२) श्री सत्यजित मदनमोहन गुजर, कोषाध्यक्ष

३) श्री प्रदीप खंडेराव कुलकर्णी, उपसचिव

५ .सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचे वाचन व मंजुरी

श्री उमेश धोपेश्वरकर, कोषाध्यक्ष, सेवक संघ यांनी सन २०२४-२५ च्या आर्थिक वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालाचे वाचन केले. त्यास उपस्थित सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

६. गतवर्षी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत झालेली चर्चा व ठराव संदर्भात करण्यात आलेली कार्यवाही-

९ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये झालेली चर्चा व ठराव याच्या अनुषंगाने सेवक संघातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील श्री मदन कुलकर्णी, कार्यकारी अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे दिला.

i) चंद्रपूर व कुंडल येथील वनक्षेत्र प्रशिक्षण प्रबोधिनी मधील सर्वप्रथम येणाऱ्या वनक्षेत्रपालांना तो कोणत्याही राज्याचा असेल तरी सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र सेवक संघातर्फे देण्यात यावे .

प्रस्तावास मान्यता देण्याबाबत विनंती करण्यात आली. अद्याप शासनाकडून काहीही कळविण्यात आलेले नाही.

ii) सेवक वार्ता अंकांचे संकलन

सेवक वार्ता अंकांचे संकलन करताना करावी लागणाऱ्या छपाईस येणारा खर्च व उपयुक्तता विचारात घेऊन निर्णय घेण्यात आला की संबंधित कार्यालयांना ईमेल द्वारे अंक पाठविण्यात यावेत.

iii.) कोलामार्काच्या नक्षलग्रस्त भागातील वन्यजीव छायाचित्रे व माहिती संकलित करून वन्यजीव संरक्षणासाठी हातभार लावत असलेले रोजंदारी कामगार श्री कपिल गुंडावार आणि श्री लक्ष्मण चौधरी यांचा सत्कार करणे

रोजंदारी कामगार श्री कपिल गुंडावार आणि श्री लक्ष्मण चौधरी या दोन्ही कामगारांचा सत्कार त्यांना प्रत्येकी रुपये १०००/- देऊन चंद्रपूर शाखेतर्फे करण्यात आला.

v) श्री मारुती चितमपल्ली, सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी यांना नुकतेच भारत सरकारने पद्मश्री देऊन गौरविले आहे. तरी त्यांचा सेवक संघातर्फे सत्कार करण्यात यावा.

सेवक संघाचे समन्वयक श्री पत्की आणि सहसचिव श्री प्रदीप कुलकर्णी यांनी सोलापूर येथे जाऊन सन्मानचिन्ह देऊन श्री चितमपल्ली यांचा सत्कार केला.

vi) निसर्ग संवर्धन आणि पर्यावरणरक्षण याविषयी समाजात जागृती करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक सभागृहात चांगल्या दर्जाचे माहितीफलक लावणे, दरवर्षी निवडक १० - १२ शाळांना या विषयांसंबंधीचे पुस्तकांचे संच वाटप करण्यात यावेत, समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांची निवड करून त्यांना प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करावे .

या विषयाच्या अनुषंगाने खाली तीन शाळांना श्री मारुती चितमपल्ली यांनी लिहिलेल्या १५ पुस्तकांचा संच देण्यात आला.

i . जिल्हा परिषद शाळा, बारीपाडा,जिल्हा धुळे

ii . जिल्हा परिषद शाळा, पालडोह ,जिल्हा चंद्रपूर

iii . जिल्हा परिषद शाळा, हिवाळे ,जिल्हा नाशिक

याशिवाय पालडोह शाळेतील शिक्षक राजेंद्र परतेकी यांचाही त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केल्याबाबत त्यांनाही सन्मानित करण्यात आले.

vi) सेवक संघाचे कामगिरीबाबत माहिती देणारी घडीपत्रिका तयार करणे

-घडीपत्रिका तयार झाली असून छपाईचे काम करावयाचे आहे.

७. जी. आय. एस. , कम्प्युटर सायन्स या विषयातील तज्ञ व्यक्तींना सेवक संघाचे सदस्य करून घ्यावे, जेणेकरून काही विशिष्ट क्षेत्रीय कामे, दस्तऐवजीकरण

(Documentation), सल्लागार सेवा प्रकल्प (Consultancy Services Projects ) यामध्ये मदत होईल.

- प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

८. सल्लागार सेवा प्रकल्प बाह्यस्रोत ( Source out ) करण्याबाबत धोरण ठरविणे ( Strategy to source out Consultancy Projects )

श्री गवळी यांनी सांगितले की सेवक संघ विविध वानिकी विषयक कामे करण्यासाठी तयार आहे असे पत्र प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वन बल प्रमुख व इतर तत्सम अधिकारी सेवक संघाने पुढाकार घेऊन प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. याबाबत या पत्राचा मसुदा तयार करून ते तो अध्यक्षांना पाठवतील असेही श्री गवळी यांनी सांगितले.

९. वानिकी आणि वन्यजीव व्यवस्थापन या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण दस्तऐवजीकरण करणाऱ्या वनरक्षक आणि वनपाल यांचा सत्कार करणे आणि त्यांना पारितोषिक देणे :

वनविभागात अनेक ठिकाणी वनरक्षक आणि वनपाल हे नाविन्यपूर्ण कामे करतात असा अनुभव आहे. श्री गवळी यांनी याबाबत सांगितले की धुळे शाखेने धुळे वृत्तातील अशा काही वनरक्षक आणि वनपाल याना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. हे पाहून वनवृत्तस्तरावरदेखील अशाप्रकारची कार्यवाही करण्यास सुरुवात झाली. इतरही काही वनवृत्तांमध्ये नाविन्यपूर्ण काम करण्याऱ्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना गौरविण्यात येत आहे. वन कर्मचाऱ्यांबरोबरच समाजातील काही व्यक्ती ज्यांनी वानिकी, पर्यावरण क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम केले आहे त्यांनाही गौरविण्यात यावे. अशा व्यक्तीं आणि त्यांनी केलेले काम याचे दस्तऐवजीकरण करणे उचित राहील.

यावर चर्चा होऊन सादर प्रस्ताव मान्य करण्यात आला.

१०. सेवक वार्ता या नियतकालिकाचे संपादक होण्यासाठी इतर सदस्यांना संधी देणे :

सध्या सेवक वार्ताच्या प्रकाशनामध्ये श्री संभाजी गवळी यांच्याकडून प्रशंसनीय कार्यवाही केली जात आहे. परंतु हे काम जवळपास एकट्याने करावे लागत आहे. त्यांना इतर शाखांकडूनदेखील प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. याविषयी चर्चेअंती असे ठरले की अन्य वृत्तस्तरीय शाखांकडून माहिती पुरविली जाण्याच्या दृष्टीने सेवक संघाच्या सर्व शाखांमध्ये समन्वयक नेमण्यात यावा आणि त्यांनी त्यांच्या वृत्तस्तरावरील माहिती सेवक वार्तासाठी पुरवावी. चर्चेनुसार खालील सदस्य वृत्तस्तरीय समन्वयक म्हणून काम पाहतील - नागपूर वृत्त - श्री सेलुकर व श्री खांडेकर, चंद्रपूर वृत्त - श्री पि. एच. झाडे, अमरावती वृत्त - श्री विवरेकर, धुळे वृत्त - श्री जयप्रकाश पाटील, पुणे वृत्त- श्री शेषराव पाटील, औरंगाबाद वृत्त- श्री सत्यजित गुजर, ठाणे वृत्त - श्री सुतळे, नाशिक वृत्त- श्री बी. डी . वाघ.

११. सेवक संघाची सदस्य संख्या वाढविणे :

सेवक संघाची सध्याची सदस्य संख्या १९४ असून त्यामध्ये सेवानिवृत्त वनाधिकाऱ्यांचा समावेश आहे.या विषयी झालेल्या चर्चेमध्ये सदस्य संख्या वाढविण्याच्या दृष्टीने काही सूचना पुढे आल्या, जसे की -

* सेवानिवृत्तीच्या दिवशी संबंधित वन अधिकाऱ्याशी संपर्क साधावा, सेवक संघाच्या कामामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करावे.

* वने, वन्यजीव, पर्यावरण संवर्धन याविषयी आस्था असणाऱ्या वनविभागाबाहेरील व्यक्तींना सेवक संघाचे सदस्य करण्यास प्राधान्य देण्यात यावे, वन विभागाबाहेरील व्यक्ती जर सेवक संघाच्या कामकाजात उपयुक्त ठरत असतील तर अशा व्यक्तींना सदस्यत्व देण्यात यावे .

१२. परीक्षार्थीना मार्गदर्शन करण्यासाठी पुस्तिका तयार करणे . यात जुन्या प्रश्नपत्रिकांची उत्तरे, मुलाखतीसाठी तयारी यांचा समावेश असावा.

वनरक्षक भरती प्रक्रियेत युवकांना मार्गदर्शन मिळणेकामी सेवक संघाने पुस्तिका तयार केल्यास ते अनेकांना उपयुक्त ठरेल असे विचार श्री पत्की यांनी मांडले. याविषयी झालेल्या चर्चेमध्ये पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले

i ) जुन्या प्रश्नपत्रिकांचा संच तयार करण्यात यावा.

ii ) श्री विजय भोसले आणि श्री शेषराव पाटील यांच्या पुस्तकातील माहिती पुस्तिका तयार करण्यास उपयुक्त ठरेल.

iii ) मुख्य वनसंरक्षक ( शिक्षण व प्रशिक्षण) यांच्या कार्यालयात अशी पुस्तिका पूर्वी तयार केली होती, त्याची माहिती मिळवावी.

iv ) पुस्तिकेची किंमत माफक ठेवावी..

पुस्तिका तयार करण्यासाठी सर्वश्री शेषराव पाटील, निरंजन विवरेकर, संजय जगताप, गुरुराज या सदस्यांचा समावेश असलेली एक समिती गठीत करण्यात आली.

१३. सेवक संघाची यु-ट्युब निर्माण करून, त्याद्वारे मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे, वन्यजीव प्रगणना, विविध वन्यप्राणी आणि पक्षी यांची माहिती, राज्यातील जैवविविधता, वनसंरक्षणात ग्रामीण जनतेचा सहभाग, महत्वाचे वनविषयक कायदे व तरतुदी यांची जाणीव नागरिकांना करून देता येईल. यासाठी आपण पुरस्कर्ते मिळविण्याचा प्रयत्न करावा.

वन विभागातील कामांबाबत लोकांना फारशी माहिती नसते. वन विभागाशी संबंधित माहिती मिळण्यासाठी सेवक संघाने पुढाकार घेऊन यु- ट्युब चॅनेल सुरु करावे असा प्रस्ताव त्यांनी मांडला. यासाठी तज्ञ व अनुभवी सदस्यांचा चमू बनवावा. सेवक संघाकडे सध्या उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करता येऊ शकेल असे विचार त्यांनी व्यक्त केले. या प्रस्तावास सभेमध्ये संमती मिळून कार्यवाही करण्याचे ठरले.

i . नागपूर- चंद्रपूर हे केंद्रबिंदू असतात, त्यामुळे तेथील शाखांनी यामध्ये पुढाकार घ्यावा.

ii. यासाठी याक्षेत्रातील कुशल, व्यावसायिक व्यक्तींची मदत घ्यावी व त्यासाठी येणाऱ्या खर्चास सुरुवातीस रु. पाच लाख रक्कम यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

iii. माहितीचे सादरीकरण ७ मिनिटापर्यंत मर्यादित ठेवावे.

iv. या उपक्रमासाठी जाहिराती आणि पुरस्कर्ते मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

१४. विशेष काम करणाऱ्यांचा सत्कार

सेवक संघामध्ये वैशिष्टपूर्ण काम करणाऱ्या काही सदस्यांचा सत्कार या सभेत करण्यात आला.

* सेवक वार्ता या नियतकालिकाचे नियमित आणि दर्जेदार प्रकाशन करीत असल्याबाबत श्री संभाजी गवळी यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

* श्री सतीश गावंडे यांनी सेवक संघाच्या अमरावती शाखेचे लेखासंबंधीची कामे सातत्याने वेळच्यावेळी आणि परिपूर्णरीत्या केल्याबद्दल त्यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

१५. अध्यक्षांचे मनोगत

सेवक संघाचे अध्यक्ष श्री विश्वास सावरकर यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांचे मेळघाटशी असलेल्या जुन्या ऋणानुबंधाबाबत आठवणी सांगत मनोगत व्यक्त केले.

* सेवक वार्तामध्ये ' आमचे मत' असे सदर सुरु करावे.

* नवी तंत्रज्ञान, शास्त्रीय माहिती, वैज्ञानिक पेपर यांच्या आधारे Knowledge Bank तयार करण्यात यावी.

* वन्यजीव व्यवस्थापनाचा परिणाम म्हणून अभयारण्ये , राष्ट्रीय उद्याने अशा संरक्षित क्षेत्रांचे मजबुतीकरण झाले आहे. आता संरक्षित क्षेत्रांच्या बाहेरील भागही तसेच सक्षम होणे आवश्यक आहे.

मेळघाट मध्ये येण्याची संधी निर्माण केल्याबद्दल अध्यक्षांनी श्री संजय जगतापांचा आभार मानले.

सभेच्या अंती श्री डी बी पवार, सहसचिव, अमरावती शाखा यांनी आभार प्रदर्शन केले.

१९ फेब्रुवारी २०२६ रोजी आमझरी येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थितांचा तपशील

सर्वश्री

(१) विश्वास सावरकर - अध्यक्ष, सेवक संघ महाराष्ट्र
(२) वि) त्र्यं. पत्की- समन्वयक, सेवक संघ महाराष्ट्र
(3) मदन कुलकर्णी -कार्यकारी अध्यक्ष, सेवक संघ महाराष्ट्र
(४) उमेश धोपेश्वरकर- कोषाध्यक्ष, सेवक संघ महाराष्ट्र
(५) संभाजी गवळी - उपाध्यक्ष - सेवक संघ महाराष्ट्र,
(६) शेषराव पाटील -सदस्य, सेवक संघ महाराष्ट्र,पुणे शाखा
(७) अर्जुन म्हसे – सदस्य,सेवक संघ महाराष्ट्र,पुणे शाखा
(८) सत्यजीत गुजर – सदस्य, सेवक संघ महाराष्ट्र,पुणे शाखा
(९) संजय जगताप - अध्यक्ष, ,अमरावती शाखा
(१०) मिलिंद तोरो – सचिव, अमरावती शाखा
(११) डी. बी. पवार – सहसचिव, अमरावती शाखा
(१२) सतीश गावंडे – कोषाध्यक्ष, ,अमरावती शाखा
(१३) अशोक खुणे - अध्यक्ष, नागपूर शाखा
(१४) जी. एस. खांडेकर - उपाध्यक्ष, , नागपूर शाखा
(१५) नरेशशचंद्र कावळे - सचिव, नागपूर शाखा
(१६) विजय खनके - अध्यक्ष, सेवक संघ महाराष्ट्र,

चंद्रपूर शाखा

(१७) एस. ए. बत्तूलवार - सचिव, चंद्रपूर शाखा

सदस्य नागपूर शाखा

(१८) ए. बी. चन्ने (१९) डी. डब्लू.तिजारे(२०) व्ही. व्ही. शहारे

धुळे शाखा

(२१) गुरुराज सुगुरे,


सदस्य चंद्रपूर शाखा

(२२. पी. एच. झाडे (२३) सुतळे

सदस्य अमरावती शाखा

(२४) निरंजन विवरेकर (२५) एन. ए. कडू (२६) जी. बी. बलोदे (२७) एम. के. निर्मळ (२८) आर. डी. बुंधाडे (२९) डी. एस. काळे (३०) व्ही. बी. निंभोरकर (३१) ए. टी. तळोकार (३२) एस. बी. बारखडे (३३) डी. एम. ठवकर (३४) ए. एच. पाटील (३५) एस. एस. कोलनकर (३६) एस. पी. घडेकर (३७) एन. व्ही. नागपूरकर (३८) एस. आर. पाचखंडे (३९) एस. जी. सुरोशे (४०) एस. पी. काकडे (४१) बी. ती. फरतोडे (४२) डी. एस. गडपांडे (४३) प्रदीप लाकडे (४४) आर. व्ही गोपाल .

## सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली



यवतमाळ वन विभागातील हिवरी वनक्षेत्रातील मनपूर परि मंडळात वन संपदा वणव्यापासून वाचवितांना विजय शिंगणजुडे (वय-४५) वनपाल, यांचे दि.१३-३-२०२६ शुक्रवारी रोजी दुःखद निधन झाले आहे.

जंगल आणि पर्यावरण वाचवताना दिलेले त्यांचे बलिदान कधीही विसरता न येणारे आहे. कर्तव्य बजावताना त्यांनी दाखवलेले धैर्य, समर्पण आणि जिद्द कायम स्मरणात राहील.

सेवक संघ परिवार त्यांच्या शिंगणजुडे कुटुंबाच्या दुःखात सहभागी असून त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना

## नाविन्यपूर्णतेचे षौकीन अशोक खुणे ......

श्री अशोक खुणे यांनी, आलेल्या दुर्धर व्याधीने ग्रस्त असून सुद्धा प्रखर इच्छाशक्ति आणि सकारात्मक विचाराचे व्यक्तिमत्व असलेले व या संकटाचा "शोक" न करता, आवडीचे षौक जोपासत त्यांच्या नवेगाव बांध येथील घराच्या गच्चीवरील वृक्ष लागवड, बागकाम,विविध तांदूळ प्रजातीच्या शेतीचा नाविन्यपूर्ण उपक्रम करून, आगळ्या वेगळ्या "खुणा" सोडत आहेत, ज्या अनेकांना प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतील. श्री. अशोक खुणे यांचे हे कार्य अनुकरणीय आहे. त्यांचे मनापासून अभिनंदन.



# जातिवंत आंबा कलमे अन् दुर्मिळ बेरींचा अनोखा प्रयोग

विदेशी फळझाडांनी फुललेलं टेरेस गार्डन : अशोक खुणे यांचा प्रयोग

**शेतीत प्रयोग**

'सुपरफूड' म्हणून ओळख

टेरेसचा योग्य उपयोग

११

## "माझे मत" My opinion

**Topic**

"Is large number of engineering graduate recruitment in forestry service by Public service commissions justified when the botany and zoology are at the core of its management"

**By Shri. V.T.Patki.**

Engeneering graduates in Forestry service are increasing because of good opportunities of scoring in the competitive examinations held by UPSC/MPSC.Even earlier also about 50% of the officers in Forestry sector were from Botany/Zoology graduation background and remaing 50% from Mathematics/Physics/Chemistry graduation background,which were non-biological subjects.

Many flora are authored by Engineers also.Mr.Cook's flora is a good example. In the two years of training, good time is spent on teaching Botany / Zoology/ Entomology/ Plant Pathology to all trainee officers.

Engineers should be good in treating unproductive forest lands by SMC works / Catchment treating activities,but they have failed in delivering there also.I feel our training needs drastical changes to utilise capability and knowledge of both biology graduates and non-biology graduates.

**Shri. BV Selukar, A.C.F. (Retd.)**

1.0 It is not a recruitment of Engineering graduates by public service commissions but it is selection of deserving candidates on merit basis having different faculties at graduation level.

2.0 As per SFS syllabus available at " dfe.gov.in " course contents for State Forest Service Officers Training Course, subjects are as follows (Periods for each subject are also mentioned there):

1.General Botany
2.Mathematics
3. Application of Modern Tools and Technology (Remote sensing techniques in forestry, Computer Applications in Forestry Application of Geographical Information System)
4. General Silviculture, Silviculture Practices, Silviculture of Indian trees, Silvicultural systems.
5. Forest Resource Management (Tree measurements, Forest biometry)
6. Forest Survey
7. Forest policy and law (11 nos)
8. Forest Engineering
9. Ecology and Environmental Science
10. Adverse influence on forests
11. Forest utilisation
12 Forest Resource Management
13. Natural Resource Management
14. Environmental Economics
15. Biodiversity Conservation and Management
16. Joint Forest Management, Rural and Tribal Development
17. Human Resource Development and Management
18. Forest Account and Procedure

3.0 Perusal of different topics being taught under each subject show that only basic knowledge of botany or zoology is needed whereas knowledge of subjects like mathematics and computer applications is widely needed. Hence, in my opinion, it cannot be said that the Botany and Zoology are at the core of Forestry Management.

4.0 Wildlife management and forestry have transitioned from conventional field-based inventory systems to technology-driven, data-intensive decision frameworks. The integration of Geographic Information Systems (GIS), Artificial Intelligence (AI), Unmanned Aerial Vehicles (UAVs/Drones), Remote Sensing, GPS Telemetry, IoT-based sensors, and Big Data analytics has significantly enhanced precision, transparency, and efficiency in forest governance and biodiversity conservation. This can be verified from the website of Wildlife Institute of India (Academics →Full Time programs → Masters Programs where Remote sensing and GIS are part of course). These subjects are the part of Engineering and not Botany or Zoology.

5.0 If any specialisation is needed for a particular operation in Forest service, then specialised courses are run by institutes like Wildlife Institute of India and others. Forest department is now utilising services of Veterinarians.

6.0 Moreover, in this Digital era, every service whether government of any department or private is computer programming oriented. Collection of data and its analysis is now a must for continuous monitoring to watch the progress of an organisation. Hence, engineering graduates are more preferred in most of the industries. This fact need not be neglected.

7.0 Engineering graduates from renowned institutes are supposed to be creams of society. It is this cream which gets selected in competitive examinations for top level services. It is said that no subject is difficult for student of Mathematics. (like Botany cannot be difficult for a student of Mathematics but Mathematics can be difficult for a student of Botany).
8.0. My opinion: It is immaterial whether the candidates selected for forestry courses are from biology stream or engineering stream. But they must be from science stream.

*********

**-पी. के. कुलकर्णी,**

या विषयातील माझे मत पुढीलप्रमाणे मांडत आहे.
आजचे वानिकी क्षेत्र अनेक तांत्रिक प्रगतीतून पुढे गेले आहे आणि आता ते जुन्या काळातील पारंपारिक वानिकीपुरते मर्यादित राहिलेले नाही. भौगोलिक माहिती प्रणाली (GIS), रिमोट सेन्सिंग, ड्रोन सर्वेक्षण, संगणकीय डेटा बेस यांसारख्या गोष्टी आजच्या वानिकीत लागू केल्या जात आहेत, ज्यामुळे हे क्षेत्र बहुआयामी बनले आहे. अशा परिस्थितीत, वन अधिकाऱ्यालाही तांत्रिक आव्हाने पेलता आली पाहिजेत. हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की, UPSC परीक्षेचे निवडीचे निकष अत्यंत कठीण आहेत आणि संपूर्ण भारतातून केवळ मोजक्याच उमेदवारांची निवड केली जाते व हे भारतातील उपलब्ध प्रतिभेचे सर्वोत्तम 'क्रीम' (उत्कृष्ट स्तर) असते. माझ्या मते, हे वानिकी क्षेत्रात अभियांत्रिकी पदवीधरांच्या निवडीचे समर्थन करते, जिथे मूळ विषयांपेक्षा प्रतिभा आणि गुणवत्तेला प्राधान्य दिले पाहिजे.
याशिवाय, वन अधिकारी दोन वर्षांचे कठोर प्रशिक्षण घेतात, जिथे त्यांना वनस्पतिशास्त्र आणि प्राणीशास्त्र यांसारख्या मूलभूत विषयांचे ज्ञानदेखील दिले जाते. एक उच्च प्रतिभावान प्रशिक्षणार्थी अशा प्रकारच्या अनुकूलनासाठी (adaptations) सर्वात योग्य असतो.
नोबेल विजेत्यांची काही उदाहरणे दाखवतात की केवळ मूळ विषय हाच उत्कृष्टतेचा आधार असू शकत नाही. श्री. व्यंकटरामन रामकृष्णन, ज्यांच्याकडे भौतिकशास्त्राची पदवी होती, त्यांना २००९ मध्ये रसायनशास्त्रातील नोबेल मिळाले. त्याचप्रमाणे, फ्रान्सिस क्रिक यांच्याकडे भौतिकशास्त्राची पदवी होती पण त्यांनी १९६२ मध्ये वैद्यकशास्त्र/शरीरशास्त्रात नोबेल जिंकले. मानसशास्त्राची पार्श्वभूमी असलेल्या डॅनियल काहनेमन यांनी २००२ मध्ये अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषक जिंकले. ही उदाहरणे सूचित करतात की 'पार्श्वभूमी नसलेल्या विषयाच्या (background) व्यक्तीचा' दृष्टीकोनही अनेकदा अशा अलौकिक दृष्टीस कारणीभूत ठरतो ज्यामुळे पथदर्शी यश मिळू शकते. प्रसिद्ध लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांना रसायनशास्त्राची पार्श्वभूमी असूनही त्यांनी माहिती तंत्रज्ञान (IT) क्षेत्रात उत्कृष्ट यश प्राप्त केले आहे. अशी कामगिरी केल्याची इतर उदाहरणे दैनंदिन जीवनातही पाहायला मिळतात, जिथे एका विषयातील गुणवंत विद्यार्थ्यांने पार्श्वभूमी नसलेल्या दुसऱ्या विषयातही चमकदार कामगिरी केली आहे.
केवळ वनस्पतिशास्त्र आणि प्राणीशास्त्र यांसारख्या मूलभूत विषयांचे ज्ञान असलेल्या अधिकाऱ्यांचीच निवड केल्यास प्रतिभेची व्याप्ती मर्यादित होईल. आजच्या या सातत्याने क्रांतिकारी परिवर्तन होणाऱ्या युगात होणारी तांत्रिक प्रगती पाहता, अभियांत्रिकी पदवीधरांची निवड केल्यास आधुनिक वानिकी क्षेत्र अधिक बळकट होईल. अग्नि प्रतिबंधासाठी आधुनिक अग्निशमन प्रणाली तैनात केल्याचे सकारात्मक परिणाम पहायला मिळाले आहेत. येथे अभियांत्रिकी पदवीधर मोठी भूमिका बजावू शकतात. वनीकरणात विविधता आणणे अत्यंत आवश्यक आहे. एकदा का तुमच्याकडे बुद्धीचा वापर आणि तर्क करण्याची क्षमता आली की, तीच क्षमता वानिकीच्या मूळ विषयांनाही लागू केली जाऊ शकते.
प्राणीशास्त्र हा विषय वानिकी क्षेत्राशी जरी निगडीत असला तरी त्या त्या विषयातील तज्ञ होण्यासाठी प्रदीर्घ अभ्यास करणे गरजेचे आहे.दोन वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीत हे कदाचित साध्यही होणार नाही. उदाहरण जर द्यायचे झाल्यास जर आज नाहीशा होणाऱ्या, दुर्मिळ होत चाललेल्या रानम्हशींची कृत्रीमरीत्या पैदास करण्यासाठी केवळ प्राणिशास्त्र या मुळ विषयाचे ज्ञान ऊपयोगी नाही तर पशुवैद्यकशास्त्रातील ज्ञानाची आवश्यकता भासते. कोलमार्क वनसंवर्धन राखीव क्षेत्राच्या व्यवस्थापन आराखडा बनविणेकामी ही जाणीव प्रकर्षाने झाली. बिबट्यांच्या संख्येवर मर्यादा आणण्यासाठी नसबंदी सारखे उपाय योजतानाही पशुवैद्यकशास्त्रातील तंत्रज्ञान महत्वाचे ठरते. याठिकाणी मुळ वनस्पतिशास्त्र आणि प्राणीशास्त्र हे विषय वानिकीसाठी अनिवार्य नसल्याचे अधोरेखित करते.
वनविभागातील विविध संवर्गाच्या वनरक्षकापासून ते सहाय्यक वनसंरक्षकापर्यंतच्या पदांमध्येही उच्च पदवीधर,अभियंते आपल्या गुणवत्तेच्या जोरावर निवड झालेले आपण पाहत आहोत. आजचे हे चित्र आहे. त्यामुळे संघ आयोगामार्फत वनसेवेतील अधिकाऱ्यांची निवड करतांना केवळ वनस्पतिशास्त्र व प्राणीशास्त्र या मुळ विषयास प्राधान्य देणे योग्य ठरणार नाही.

**जागतिक वन दिनानिमित्त मॅरेथॉन ... वन संवर्धनाच्या जागृतीसाठी प्रकाश कुकडोलकर धावले. . .**

**वाकड, ता. २२ : जागतिक वन दिनानिमित्त दुसऱ्या पर्वातील मॅरेथॉनचे आयोजन कस्पटे वस्ती येथील निसर्ग सृष्टी सोसायटीत करण्यात आले. त्याप्रसंगी सोसायटीतील सेवक संघ जेष्ठ सदस्य प्रकाश कुकडोलकर, अनेक चिमुकले, महिला, ज्येष्ठ नागरिक व तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत यशस्वी धाव घेतली.**
**'रन फॉर फ्युचर' आणि 'सेव्ह फॉरेस्ट' हा संदेश देत सोसायटी परिसरातून ३ किलोमीटर ५ किलोमीटर अशा दोन अंतरात मॅरेथॉन झाली. यावेळी प्रकाश कुकडोलकर, महापालिका स्थायी समिती सदस्य संदीप कस्पटे, भारतीय जनता युवा मोर्चाचे उपाध्यक्ष प्रसाद कस्पटे आर्दीच्या हस्ते कडुनिंबाचे रोप लावण्यात आले. संस्थापक अध्यक्ष प्रकाश कुकडोलकर यांनी आभार मानले.**

**"वरिष्ठ नागरिकांना समर्पित**

**मी कोण ?**

**नोकरी संपली, दिनक्रमही गेला,घरातली गजबजही थांबली,
आणि शांततेच्या प्रतिध्वनीत मी स्वतःला शोधायला लागलो.
मी कोण ?
बंगलो बांधले, फार्महाऊस उभारले, मोठी-लहान गुंतवणूक केली,
आणि आता?
चार भिंतीत अडकून पडलोय.
सायकलवरून मोपेड, मोपेडवरून मोटार,मोटारीतून गाडी,
गती आणि स्टाईलच्या मागे धावलो,
पण आता?**

हळूहळू पाय रेंगत रेंगत आपल्या खोलीतच फिरतोय.
निसर्गाने विचारलं
"कोण आहेस रे मित्रा?"
मी म्हणालो,
"मी... फक्त मीच."
राज्य, देश, खंड फिरलो,
पण आज
माझे प्रवास हॉलपासून स्वयंपाकघरापर्यंतच.
संस्कृती, परंपरा जाणून घेतल्या,
पण आता ?
माझ्या कुटंबाने मला समजून घ्यावं अशी इच्छा आहे.
निसर्ग हसून म्हणाला—
"कोण आहेस रे मित्रा ?"
मी उत्तर दिलं,
"मी... फक्त मीच."
पूर्वी वाढदिवस, लग्नसमारंभ मोठ्या थाटामाटात केले,
पण आज ?
फक्त छान झोप लागली, भूक लागली, हेच साजरं करतो.
सोने, चांदी, हिरे, मोती, सगळं बँकेत गप्प बसलंय.
सूट-बूट कपाटात लटकलेले. आता फक्त मऊ सूताचे कपडे,
साधेपणातला आराम.
इंग्रजी, फ्रेंच, हिंदी शिकलो,
पण आता ?
माझ्या मायबोलीतच सुख मिळतं.
व्यवसायासाठी जगभर धावलो, नफा-तोट्यांची गणितं केली,
पण आज ?
फक्त आठवणींमध्ये हिशोब करतो.
व्यवसाय सांभाळला, कुटुंब जोडलं,खूप नाती केली,
पण आता?
शेजारचा साधा-सोपा माणूसच माझा जिवलग सोबती आहे.
नियम पाळले, शिक्षण घेतलं,
पण आता कळतंय, खरं महत्त्वाचं काय आहे.
जीवनाचे चढउतार अनुभवून,शांत क्षणी
माझ्या आत्म्यानेच मला सांगितलं:
"पुरे झालं आता...तयार हो प्रवासी,अंतिम प्रवासासाठी..."
निसर्ग पुन्हा हसून विचारतो..
"कोण आहेस रे मित्रा?"
मी हळूच म्हणतो:
"अरे निसर्गा, तूच मी...आणि मीच तू.
एकेकाळी आकाशात झेपावलो,
आता जमिनीलाही प्रेमाने स्पर्शतो. मला माफ कर...
एकदा पुन्हा जगू दे मला, पैशाच्या यंत्रासारखा नव्हे,
तर खराखुरा माणूस म्हणून.मूल्यांसह, कुटुंबासह,
आणि प्रेमासह."

***संपत्ती एका झटक्यात, सौंदर्य एका आजारात, आणि प्रतिष्ठा एका चुकीत नष्ट होते ! म्हणूनच या तिन्ही गोष्टींचा कधीही गर्व करू नका .**

## ..भारतीय राज्यघटना मनोरंजक माहिती

**अंजली गंधे (९८५०८४४५७४)**

भारताच्या संविधानाबद्दल, आपण सहसा त्यात किती शब्द आहेत, किती भाग आहेत, किती अनुच्छेद, किती अनुसूची आहेत इत्यादी क्लिष्ट माहिती वाचतोच. पण आज आपण संविधानाबद्दल जरा मनोरंजक माहिती बघूया.

भारताची राज्यघटना हाताने लिहिली आहे हे किती भारतीयांना माहीत आहे. संपूर्ण संविधान लिहिण्यासाठी कोणतेही यंत्र वापरले गेले नाही. दिल्लीचे रहिवासी असलेले प्रेमबिहारी नारायण रायजादा यांनी हा मोठा ग्रंथ, संपूर्ण राज्यघटना, तिर्यक (Italic) शैलीत स्वतःच्या हातांनी लिहिली आहे.

प्रेम बिहारी हे त्या काळातील प्रसिद्ध सुलेखक (कॅलिग्राफर) होते. त्यांचा जन्म १७ डिसेंबर १९०१ रोजी दिल्लीतील एका प्रसिद्ध हस्ताक्षर संशोधकाच्या कुटुंबात झाला. लहान वयातच त्यांच्या आई, वडिलांचे निधन झाले. ते आजोबा राम प्रसाद सक्सेना आणि काका चतुर बिहारी नारायण सक्सेना यांच्याबरोबर राहू लागले. त्यांचे आजोबा राम प्रसाद हे सुलेखक (कॅलिग्राफर) होते. ते फारसी आणि इंग्रजीचे अभ्यासकही होते. इंग्रजी सरकारच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना ते फारसी भाषा शिकवत असत.

प्रेम बिहारी यांचे आजोबा त्यांना सुंदर हस्ताक्षरासाठी लहानपणापासून सुलेखन कला शिकवत. दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजमधून पदवी घेतल्यानंतर प्रेम बिहारी यांनी आजोबांकडून शिकलेल्या सुलेखन कलेचा सराव सुरू केला. हळुहळु सगळीकडे त्यांच्या सुंदर हस्ताक्षराची कीर्ती पसरु लागली. जेव्हा संविधान छपाईसाठी तयार झाले, तेव्हा भारताचे तत्कालीन पंतप्रधान, जवाहरलाल नेहरूंची इच्छा होती की संविधान छापण्याऐवजी हे हस्तलिखित तिर्यक (Italic) शैलीत सुलेखनात लिहावे. नेहरुजींनी मग प्रेम बिहारी यांना बोलावले आणि त्यांना संविधान तिर्यक शैलीत हातानी लिहिण्याबद्दल सांगितले आणि विचारले की, "तुम्ही किती फी घ्याल?" प्रेमबिहारी नेहरूजींना म्हणाले, "एक पैसाही नाही. देवाच्या कृपेने माझ्याकडे सर्व काही आहे आणि मी माझ्या आयुष्यात खूप आनंदी आहे." असे म्हणून त्यांनी नेहरूजींना विनंती केली "माझी एक इच्छा आहे की संविधानाच्या प्रत्येक पानावर मी माझे नाव लिहीन आणि शेवटच्या पानावर माझे नाव माझ्या आजोबांच्या नावाबरोबर लिहीन." नेहरूजींनी त्यांची विनंती मान्य केली.

लेखन सुरू करण्यापूर्वी, नेहरूजींच्या सांगण्यावरून प्रेमबिहारी नारायण भारताचे तत्कालीन राष्ट्रपती श्री.राजेंद्र प्रसाद यांच्यासोबत शांतिनिकेतनला गेले. त्यांनी प्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांच्याशी चर्चा केली. त्यामुळे आपले संविधान फक्त हातानीच लिहिले आहे असे नाही तर शांतीनिकेतन मधल्या नंदलाल बोस आणि त्यांच्या चित्रकार टीमने त्याचे मुखपृष्ठ व प्रत्येक पान आपल्या सुंदर कलेने सजवले आहे. भारताचे संविधान हे जगातील एकमेव असे

संविधान आहे ज्याचे प्रत्येक पान सुंदर चित्रांनी सजवले आहे.

प्रेम बिहारी यांनी कॉन्स्टिट्युशन सभागृहातील एका खोलीत तब्बल सहा महिने बसून संपूर्ण भारतीय संविधानाची हस्तलिखिते लिहिली. भारतीय राज्यघटना लिहिण्यासाठी त्यांना ४३२ निबे लागली. त्यांनी निब क्रमांक ३०३ वापरला होता. पेनांची निब इंग्लंड आणि चेकोस्लोव्हाकिया येथून आणली होती. संविधान लिहिण्यासाठी २५१ पानांचा विशिष्ट प्रकारचा पातळ कागद (parchment paper) वापरावा लागला. संविधानाच्या ग्रंथाचे वजन ३ किलो ७५० ग्रॅम आहे आणि तो २२ इंच लांब आणि १६ इंच रुंद आहे.

प्रेम बिहारी यांचे १७ फेब्रुवारी १९६६ रोजी निधन झाले. संविधानाची हिंदी कॉपी सुलेखक वसंत कृष्ण वैद्य यांनी लिहिली आहे. त्यासाठी पुणे येथील हँडमेड पेपर रिसर्च सेंटर मधून पेपर आणला होता.

आपल्या संविधानाची १९५० सालची मूळ इंग्रजी प्रत आणि त्याच्या हिंदी अनुवादाची प्रत आपल्या संसदेच्या लायब्ररीमध्ये दोन विशिष्ट प्रकारच्या काचेच्या खोक्यात ठेवली आहे. ह्या ग्रंथाचे कागद खराब होऊ नयेत म्हणून ह्या सीलबंद काचेच्या खोक्यात नायट्रोजन वायू भरला आहे. व्यवस्थित सिलिंग असूनही दर ७ महिन्यांनी ५ घन सेंटीमिटर ऑक्सिजन दोन्ही बॉक्समध्ये प्रवेश करतो. यावर उपाय म्हणून दोन्ही बॉक्समधे ऑक्सिजन नष्ट करणारी रसायने ठेवण्यात आली आहेत. अजून एक प्रत ग्वाल्हेरच्या सेन्ट्रल लायब्ररीमध्ये ठेवली आहे.

अशी आहे आपल्या संविधानाच्या ग्रंथाची कहाणी !!!

प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा !!!

....×××....

**एखादा पदार्थ किंवा धान्य /भाजी खाण्याजोगे करण्यासाठी आपण किती प्रकारच्या प्रक्रिया त्यावर करतो?** बघाच ते .....

(१) खुडून (२) निवडून (३) पाखडून (४) चाळून (५) वेचून (६) दळून (७) कांडून (८) मळून (९) भिजवून (१०) शिजवून (११) भाजून (१२) परतून (१३) गाळून (१४) धुवून (१५) वाळवून (१६) आटवून (१७) मुरवून (१८) तळून (१९) लाटून (२०) पसरुन (२१) वाफवून (२२) कुटून (२३) वाटून (२४) कालवून (२५) साठवून (२६) खारवून (२७) पाकवुन (२८) ठेचून (२९) सोलून (३०) चिरुन (३१) कापून (३२) नासवून (३३) फेटून (३४) ढवळून (३५) उकळवून (३६) वळुन (३७) थापून (३८) उकडून (३९) उलथवून (४०) तिंबून (४१) मिसळून (४२)घुसळून (४३) चोचवून (४४) कातरून (४५) फोडून (४६) पाडून (४७) ओतून (४८) काढून (४९) झाकून (५०) खरवडून (५१) विरजून (५२) गुंडाळून (५३) बांधून (५४) टांगून (५५) रांधून (५६) कुस्करुन (५७) चापून /चोपून (५८) पेरून ५९) कोचून (६०) उगाळून (६१) आंबवून (६२) उकडून (६३)फुंकून (६४)तोंडीं भांड ठेवून (६५) आधबाण आणून (६६) खोवून (६७) घोळून (६८) किसून (६९) फेसुन

मराठी भाषेचे वैभव हे आपल्या संस्कृतीशी, खाद्यसंस्कृतीशी निगडीत आहे. वरीलपैकी बरेच शब्द लुप्त होत आहेत. कारण यातील बऱ्याच क्रिया आता केल्या जात नाहीत, कारण ते पदार्थही केले जात नाहीत.

संकलक - अज्ञात। व्हाट्सअप्प।

## माझी फोटोग्राफी-४

**-प्रमोद यादव**

आज तारीख 24 9 2025. आजचा ट्रेक जवळ जवळ 15 किलोमीटर होता. नामचे बाजार ते डेबूचे (Debuche ) असा होता. ट्रेक चालताना दूधकोशी नदीवरील झुलता पूल क्रॉस करून व मोठी चढण चढून जावे लागणार होते. सकाळी नेहमीप्रमाणे लवकर उठायची सवय असल्याने लवकरच जाग आली .तेथील हवामान आणि ऑक्सिजन विरळ असल्याने हवी तशी झोप झालीच नव्हती. हा अनुभव आम्हा ग्रुप मधील सर्वांनाच आला होता. साडेसात वाजता ट्रेक सुरू होणार होता सर्व ट्रेकर नेहमीप्रमाणे आवरून हॉटेलच्या मुख्य डायनिंग हॉलमध्ये आले होते. गप्पा मारत नाश्ता चालला होता. पण यावेळी गरम पाणी पिण्याची गरज होती. त्या प्रमाणे आम्ही हॉटेल मध्ये गरम पाणी मागितले तर त्याला देखील पैसे द्यावे लागत होते. नाश्ता जरी चांगला असला तरी तो खाण्याची इच्छा होत नसे .कारण तेथील हवामानामुळे या गोष्टी घडत होत्या. पण रोज चार लीटर पाणी पिलेच पाहिजे असे मिहिर ने सर्वांना सांगितले होते. कारण तंदुरुस्त शरीर राहण्यासाठी आवशक होते .जर तितके पाणी पिले नाही तर त्याचा शरीरावर परिणाम होत असे .









सगळे तयार होऊन नेहमीप्रमाणे साडेसात वाजता आमचा ट्रेक सुरू झाला. वातावरण स्वच्छ व सुंदर होते .त्यात मोकळेपणा होता. सुरुवातीला रस्ता बऱ्यापैकी सपाट होता. पाईन वृक्ष मधून वाटेत उभे होते. चालत चालत पुढे जात असता बुद्धांची प्रार्थना स्थळे(स्तूप ) वाटेत भेटले . त्यामुळे साहजिकच सर्व ट्रेकर तेथे थांबत असत . विसावा घेत व फोटो काढण्यासाठी थांबत असत . काही जण मोबाईल मध्ये फोटो काढत असत. स्तूपाचे खालील बाजूने रस्ता होता. परंतु ट्रेकर हे दर्शना साठी वरील दिशेने जाणाऱ्या वाटेने चढत असत.स्तूपच्या सभोवताली मोकळी जागा होती. त्या ठिकाणी उभे राहून रस्त्यावरून फोटो काढत असे. या ठिकाणी चढण आणि उंची असल्यामुळे खाली उतरताना बऱ्यापैकी मोठ्या पायऱ्या होत्या. या ठिकाणी मला उतरताना गळ्यात कॅमेरा असल्यामुळे उतरताना अवघड जात होते. त्याचवेळी एक फॉरेनर ट्रेकरने मला मदतीसाठी हात पुढे केला. आणि मी त्याच्या हाताला धरून खाली उतरलो. सहज चौकशी केली तर त्यांनी सांगितले की मी लंडन येथून आलेलो आहे. आणि मग अशी मदत करणारा माणूस म्हणून मी त्याचा फोटो काढला. त्याने आवडीने मला फोटो काढून दिला. त्याचा फोटो देखील मी शेअर करत आहे .या ठिकाणी जात पात,धर्म असले काहीच नसते. त्या ठिकाणी असतो फक्त एक विचार आणि तो विचार म्हणजे फक्त मानवता,मानवता आणि मानवता.

जगभरचे आलेले ट्रेकर या ठिकाणी एकमेकास सहकार्य करतात. हे पाहून हे विश्वचि माझे घर हे त्या ठिकाणीच चांगलेच जाणवते. ज्या ठिकाणी गरज असते त्याच ठिकाणी सहकारी भेटणे आपले भाग्यच की . परत हे कधीच आयुषात भेटनार नसतात . फक्त तोच क्षण आपल्या साठी ते आयुषात आलेले असतात .

आज जो ट्रेकिंग रस्ता होता तो हिमालयातील कुंभू व्हली मधून जात होता. साधारणता चहासाठी 11चे दरम्यान थांबलो. त्याचवेळी आणलेले सहकारी मित्राणी बदाम, खारीक चिक्की यांची वाटप ग्रुप मध्ये एकमेकांमध्ये केली . अगदी बंधूप्रेमाची तिथे असते .असे मस्त देवाण-घेवाण झाल्यानंतर अर्धा तास तिथे विश्रांती घेऊन चहा घेतल्यानंतर तिथून पुढचा ट्रेक सुरु झाला.

दूधकोशी नदीच्या दिशेने खाली मोठीदरी उतरण्यासाठी प्रवास सुरू झाला. ट्रेकिंग करताना थंडी असेच . त्यामुळे अंगात गरम कपडे आणि गॉगल चा वापर करावाच लागत असे . सुर्य किरणांचा डोळ्यावर तसेच शरीराच्या उघडया भागावर सूर्यप्रकाशाचा काही परिणाम होऊ नये म्हणून चेहरा मोकळा जरी असला तरी त्यावर क्रीम लावावे लागत असे. जेवढा शरीराचा भाग सूर्यप्रकाशापासून झाकता येईल तेवढे चांगले. अन्यथा तेथील अल्ट्राव्हाईट किरणामुळे शरीराची कातडी करपली जात असे. हा अनुभव काश्मीरमध्ये 7 लेक ट्रेक करताना आलेला होता. त्यावेळेस हाताचा भाग उघडा असल्यामुळे पूर्णतः इकडे आल्यावर तो काळा दिसत होता. कातडीवर हळूहळू परिणाम होऊन नंतर तेथील कातडी खराब झालेली होती. आणि त्याच्यानंतर त्याचे पापुद्रे निघत होते.

पुढे गाईडने सांगितले आता आपण नदी जवळच आलो आहे दुपारच्या जेवणाची वेळ झालेली आहे तर नदीच्या काठावर असलेल्या हॉटेलमध्ये दुपारच्या जेवणाची सोय आहे. तेथे त्यांनी आपण जे जेवणाची ऑर्डर दिली ते त्यांनी दिले . शक्यतो भात आणि अंड्याचा रस्सा ऑर्डर मध्ये घेतला होता. अंड्याचा रस्सा चांगला असला तरी वातावरणामुळे तिथे जेवणाची इच्छा कमी झाली होती. ते जेवण कसे बसे करून आम्ही दूध कोशी नदीवरील झूलता पूल पार केला .

सोबतीला असणारे मिहीर, नेपाळमधील मदतनीस भरत ,संपन् यांची खूप मदत होत असे. हॉटेलमध्ये आम्हा लागणारे जेवण ते लगेच आणून देत असे. कारण तिकडे हॉटेलमध्ये वेटर तिथे नसतात.हे जे आपल्याला मदत करणारे आपल्याबरोबरचे जे सोबत असणारे जे आपले गाईड हेच आपल्याला तेथे जेवण देण्यासाठी मदत करत असतात. जेवणाची ऑर्डर अगोदरच विचारून दिली जात असे . ट्रेक मध्ये सर्वांचे एक कुटुंबच सदस्यासारखे नाते तयार झाले होते. त्याच्याशिवाय पर्याय नव्हता. इतके दिवस बाहेर जाण्यामुळे जरी आपण एकटे गेलो तरी एवढी अडचण येत नसे.

पण अशा ठिकाणी अत्यंत एकमेकाला मदत करणे गरजेचे असते. कधी कॅमेऱ्याची बॅग घेणे किंवा हा मध्येच पाण्याची बॉटल देणे काही लागले तर मेडिसीन गोळ्या देणे हे सगळं अत्यंत गरजेचे होते. नदीवरील झूलता पुल क्रॉस केल्यानंतर आम्ही टेन्गबोचे (Tengboche) च्या दिशेने वर मोठी चढण चढण्यास सुरुवात केली. दुपारचे दोन वाजले असतील जेवण झाल्यावर तशीही मोठी चढण चढणे अवघडच होते. ट्रेक वळणाचा असला तरी उंच असा तो एक पर्वत आहे. हिमालयातल्या मोठ्या रांगा आहेत .आणि तो चढणे तितकं काही सोपं नव्हतं. हळूहळू पावले टाकत आमचा ट्रेक सुरू झाला होता. वाटेत बऱ्यापैकी तेथील पाइनवृक्षाची झाडे तेथे दिसत होती . शिवाय हिमालयातली फुलपाखरे, वेगवेगळी फुले वेगवेगळी झाडे आणि पक्षाचे दर्शन होत असे. पुढे वर अडीच तासाची चढण चढून आल्यावर सुंदर असा आम्हास बुद्ध स्तूप लागला . तेथे पोहोचलो आणि लागलीच काही काळ पावसाचा चांगला शिडकावा तिथे आला. पांचो सोबत

ठेवला होता. तो लागलीच काढला . आणि पावसापासून बचाव केला. त्यानंतर आम्ही पुढे गेलो तर काही अंतरावरच टेन्गबोचे येथील सुंदर देखणी मॉनेस्ट्री पाहिली. बराच वेळ तिथे थांबल्यानंतर तेथे काहीफोटो काढले.

आता शेवटचा टप्पा सुरू झाला. आता पुढच्या बाजूला म्हणजे डेबोचे (Debuche ) बाजूला जाण्यासाठी आमची तयारी सुरू झाली. साधारण पाच वाजले असतील. आम्ही आता पुढच्या दिशेने म्हणजे डेबूचे जे दिशेने सुरुवात केली होती. उताराचा रस्ता होता लवकरच दोन-तीन किलोमीटर हा प्रवास पूर्ण करून आम्ही हॉटेल पॅराडाईज Debuche या ठिकाणी पोहोचलो. तेथे पोहोचल्यानंतर हॉटेलमध्ये चहा घेतला. या ठिकाणी प्रचंड असे धुके पडलेले असल्याने थंडी देखील खूप वाजत होती, प्रचंड गारठा होता. मायनस टेंपरेचर तिथं झालेले होते.जेवण करून गप्पा सुरू झाल्या होत्या . मुख्य हॉल मध्ये हिटर लावलेले होते . झोप चांगली कशी येईल याचा विचार मनात चालू होता. हॉटेल रूम मध्ये गेलो . निद्रा देवीची प्रार्थना करून झोपण्याचा प्रयत्न सुरू केला. झोपेच्या कालचा अनुभव बरोबर नव्हता .अंगावर गरम पांघरून घेऊन झोपण्याचा.

क्रमशः ........

## आरोग्य साधना .....



**ज्येष्ठ नागरिक सप्ताहाच्या शुभेच्छा!**

**काय कमी करावे?**
१. मीठ
२. साखर
३. पांढरे पीठ
४. दुग्धजन्य पदार्थ
५. प्रक्रिया केलेले अन्न
६. वादविवाद
७. आक्षेप

**काय खावे?**
१. भाज्या
२. डाळी
३. बीन्स
४. सुकामेवा
५. थंड दाबलेले तेल (ऑलिव्ह, नारळ)
६. फळे
७. एखाद्याचे कटू शब्द/दुःख गिळणे

**या ४ गोष्टी विसरण्याचा प्रयत्न करा.**
१. तुमचे वय
२. तुमचा भूतकाळ
३. तुमच्या तक्रारी
४. नातेवाईकांचे त्रास

**या गोष्टींची काळजी घ्या.**
१. तुमचे कुटुंब व तुमचे मित्र
२. तुमचे सकारात्मक विचार
३. स्वच्छ आणि आनंदी घर
४. भविष्यातील कठीण काळासाठी तुमचे सर्व पैसे साठवा.

**या ४ गोष्टींचा अवलंब करा.**
१. नेहमी हसत रहा
२. नियमित व्यायाम करा
३. वजनावर नियंत्रण ठेवा
४. तुमच्या जिभेत गोडवा नसला तरीही तो जोपासा

**या ७ जीवनशैलीच्या सवयी ज्या पाळल्या पाहिजेत.**
१. नियमितपणे पाणी प्या फक्त तहान लागल्यावरच नाही.
२. वेळेवर विश्रांती घ्या, थकल्यावर नाही.
३. आजारी पडल्यानंतरच नाही तर नियमित तपासणी करा
४. चमत्काराची वाट पाहू नका.
५. स्वतःवर विश्वास ठेवा.
६. नेहमी सकारात्मक रहा आणि उज्ज्वल भविष्याचा विचार करा.
७. सतत एकाच ठिकाणी बसू नका.

ज्येष्ठ नागरिक सप्ताह

तुमचे ४७ ते ९० वयोगटातील मित्र आहेत का? त्यांना हा संदेश नक्की पाठवा.

ज्येष्ठ नागरिक सप्ताहाच्या शुभेच्छा! सर्वांना निरोगी आणि आनंदी जीवनासाठी शुभेच्छा!

## वाचक प्रतिक्रिया -सेवक वार्ता, फेब्रुवारी-२०२६

फेब्रुवारी 2026 सेवक वार्ता अंक नेहमीप्रमाणे अति उत्तम आहे व हा अंक AGMनंतर लगेच सर्व तपशीलवार प्रकाशित करणे हे मेहनत व कौशल्याचे प्रतिक आहे. उत्तम संकलन तर आहेच पण क्रमशः असणारा लेख 'माझी फोटोग्राफी' उत्कंठा निर्माण करतो व विषेशतः तंटया भिल्ल आणी त्याचा इतिहास 1857 च्या सोनेरी पानांत चपखल बसेल. सेवक वार्ताची लेखणी अतिशय प्रशंसनीय आहे. AGM चा वृत्तांत उल्लेखनीय आहे

- विश्वास सावरकर.

-संजय जगताप

फेब्रूवारी २०२६ चा सेवक वार्ता अंक वाचून आनंद झाला.तंट्या भिल्लाची शौर्य कथा,प्रमोद यादवांची छायाचित्रे व प्रवास वर्णन,सेवक संघाच्या १९-२-२०२६ आम सभेचा सविस्तर वृत्तांत,याने अंक सजलेला असून सौंदर्य वाढवीत आहे.फोटो सुध्दा लज्जत वाढवीतात.श्री.गवळी यांचे अभिनंदन व शुभेच्छा.–

- व्ही. टी. पत्की

**Great job Gawaliji. Timely and effective coverage of the AGM and inputs of the happening in surrounding makes the newsletter attractive and informative.**

- सत्यजित गुजर

- माझा लेख "तंट्याभील " हा सेवक वार्ता, माहे फेब्रुवारी मध्ये प्रकाशित केल्या बद्दल धन्यवाद. –म.आ. सैंदाणे
- सेवक वार्ता, फेब्रुवारी २०२६' च्या अंकात माझ्याविषयी छान बातमी दिल्याबद्दल आपले खूप खूप धन्यवाद.

– रामदास पुजारी

- सेवक वार्ता आपल्या परिश्रमामुळे खूप चांगल्या प्रकारे न चुकता येत आहे. त्यासाठी आपले हार्दिक अभिनंदन.




केवळ खाजगी वितरणासाठी . . . .
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६